डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
# वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ
वाघापूर रोड, यवतमाळ-४४५००१(महाराष्ट्र)

डॉ. एन. डी. पार्लावार
पी. एच. डी. ॲग्रोनॉमी
सहयोगी अधिष्ठाता

दुरध्वनी : ०७२३२-२५१७४५
फॅक्स : ०७२३२-२५१७४५
ई-मेल : vncabt.ytl@gmail.com

जा.क्रं/वनाकृजैतंम/ 168 /२०२०
दिनांक : 18/०६/२०२०

## सुधारीत निविदा सुचना

प्रति,

मे. ..................................................

..................................................

**विषय:** **वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ या कार्यालयाकरिता सहकारी संस्थांमार्फत ठेकेपध्दतीने/ कंत्राटी तत्वावर मजुर पुरविण्यासाठी निविदा दरपत्रक पाठविण्याबत ...**

या सुचनेव्दारे खालील नमुद केल्यानुसार कामांकरिता **सहकारी संस्थांनी** ठेकेपध्दतीने/ कंत्राटी तत्वावर मजुर पुरविण्यासाठी आपले निविदा दरपत्रक या कार्यालयास दि. २६/०६/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजे पर्यत किंवा त्यापुर्वी सकाळी ८.०० ते १.०० या कार्यालयीन वेळेवर पाठवावे हि विनंती

| अ. क्रं. | मजुरांचे विवरण | मजुरांची संख्या | दर प्रती महिना (रु.) किमान वेतन कायदा अनुसार |
|---|---|---|---|
| १ | मुलांचे वसतीगृह | ०४ | |
| २ | मुलीचे वसतीगृह | ०४ | |
| ३ | ग्रंथालय साफसफाई, पुस्तकांची मांडणी व देखभाल इ. दैनंदीन कामाकरीता | ०१ | |
| ४ | व.ना.कृ.जै.म., यवतमाळ प्रक्षेत्र ( शेतीची कामे) | ०४ | |
| ५ | गेस्टहाउस साफसफाई, देखभाल व परीसर स्वच्छता इ. | ०१ | |
| ६ | कार्यालयातील स्वच्छता गृह व मुलांचे वसतीगृह येथील स्वच्छतागृहाची स्वच्छता करणे | ०१ | |
| ७ | प्रयोगशाळा स्वच्छ करणे, प्रयोगशाळेतील उपकरणे स्वच्छ करणे इ. | ०२ | |
| ८ | कार्यालय स्वच्छता मिटींग हॉल,आस्थापना विभाग,शिक्षण विभाग,प्लेसमेंट सेल, क्लासरुम,कार्यालयातील पूर्ण पॅसेज इ. | ०१ | |
| ९ | चौकीदार/पहारेकरी (मेन गेट ०३, गेस्ट हाउस ०३,मुलीचे वसतीगृह ०३) | ०९ | |

कृपया दर नमुद करतांना खालील दिलेल्या सुचना तसेच मागील पानावरील शर्ती व अटी काळजीपूर्वक लक्षात घ्याव्यात.

Scanned with CamScanner

१. निवीदा दरपत्रके कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ०८.०० ते दुपारी १.०० या वेळेत स्विकारले जातील. मुदतीनंतर येणारी निवीदा दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.
२. डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कंत्राटी मजुरांकरीता असलेल्या दराचे अवलोकन करावे.
३. दरपत्रके सिलबंद पाकीटात पाठवावीत.
४. दरपत्रके या निविदा सुचनेचा संदर्भ क्रं. नमुद करावा. निवीदा दरपत्रकातील दर सर्व करांसहीत (GST) असावेत. ज्या सेवांना (GST) लागू आहे त्या बाबतच (GST) नमुद करावे.
५. निविदा दरपत्रके **सहयोगी अधिष्ठाता, वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ** यांचे नावाने द्यावे तसेच पाकीटावर **"कंत्राटी मजुर पुरविण्याकरिता दरपत्रक "** असे नमुद करावे.
६. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचे अथवा अस्विकारण्याचे तसेच निविदा प्रक्रीया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामे ही दैनंदीन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे दैनंदिन आठ तासाचे काम राहील.
२. कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तीची व्यवस्था किंवा कामावर हजेरी लावावी.
३. सदर कामे ही पुर्णतः ठेकेपध्दती / कंत्राटी असल्याकारणाने मजुरांच्या वरिष्ठता यादीत काम अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.
४. कोणत्याही कंत्राटी मजुराला कामावर ठेवणे वा मधुन काढुन टाकणे हे संपूर्ण अधिकार सहयोगी अधिष्ठाता, व.ना.कृ.जै.तं.म., यवतमाळ यांचे कडे आहेत.
५. कामावरील कंत्राटी मजुराला किमान वेतन कायदा अंतर्गत वेतन देण्यात यावे.
६. कामावरील रोजंदार मजुराचे अपघात वीमा, भ.नि.नि. खाते वा वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुराचे देय लाभ उपलब्ध करुन देण्याची संपुर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार / ठेकेदार याची राहील.
७. सदर रोजंदार मजुर पुरविणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. नोंदणीचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे तसेच GST नोंदणी संदर्भातील दस्तऐवज सोबत जोडण्यात यावेत.

सदर दरपत्रक दि.२६/०६/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता सहयोगी अधिष्ठाता यांचे कक्षात उघडण्यात येईल.

सहयोगी अधिष्ठाता
वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान
महाविद्यालय (डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला)

प्रतिलिपी:-

1- प्रभारी अधिकारी, (ARIS Cell) प्रभारी डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना सदर निविदा विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या विनंतीसह अग्रेषीत.

Scanned with CamScanner